**ठळक बातम्या**

- राज्यात महिला मतदारांच्या संख्येत लक्षणीय वाढ
- धाराशिव जिल्ह्यातल्या सुमारे ३ हजार हेक्टर शासकीय जमिनीची शेतकऱ्यांच्या नावावर खोटी नोंद करणाऱ्या २४ महा ई सेवा केंद्रचालकांवर गुन्हा दाखल
- मराठा आरक्षण विचारात घेऊन लोकसेवा आयोग विविध परीक्षांच्या नव्या तारखा लवकरच जाहीर करणार

**आणि**

- येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता

**<><><><><>**

राज्यातल्या महिला मतदारांच्या संख्येत गेल्यावेळेच्या तुलनेत वाढ झाली आहे. यंदा १ हजार पुरुषांमागे ९२३ महिला असं प्रमाण आहे. २०१९ मध्ये ते १ हजार पुरुषांमागे ९११ महिला आणि २०१४ मध्ये १ हजार पुरुषांमागे ८८९ महिला मतदार होत्या.

महिला मतदारांमध्ये मतदानाप्रती जागरूकता वाढवण्यासाठी निवडणूक आयोग “स्वीप” कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवत आहे. याकरता जनजागृती करण्यासाठी अंगणवाडी सेविका, आशा कर्मचारी, परिचारिका, महिला बचत गट आणि अशासकीय संस्थांची मदत घेतली जात आहे. याशिवाय उद्योग, शिक्षण, सामाजिक, कला-संस्कृती, साहित्य यासह विविध क्षेत्रात अग्रणी असलेल्या महिलांच्या माध्यमातून महिलांना मतदार नोंदणीसाठी प्रोत्साहित केलं जात आहे.

<><><><><>

राज्यातल्या दुसऱ्या टप्प्यातल्या लोकसभा निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याची मुदत येत्या सोमवारी दुपारी ३ वाजेपर्यंत आहे. नांदेड मतदार संघातून आज मोहनराव आनंदराव वाघमारे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे उमेदवाराची संख्या ६५ झाली. परभणीत आज कोणीही उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही. या टप्प्यात राज्यात २६ एप्रिलला आठ मतदारसंघात मतदान होणार आहे.

<><><><><>

कल्याण लोकसभा मतदारसंघात शिवसेनेचे विद्यमान खासदार डॉ. श्रीकांत शिंदे हेच महायुतीचे उमेदवार असतील, असं भाजपचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. भाजपा पक्ष स्थापना दिनानिमित्त नागपुरात आयोजित कार्यक्रमानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

भारतीय जनता पक्ष हा देशातील सर्वात मोठा सदस्य असलेला त्याचप्रमाणे सर्वात जास्त स्थानिक लोकप्रतिनिधी आणि आमदार असणारा पक्ष आहे. या पक्षात कधीच फूट पडली नाही कारण या पक्षाचे कार्यकर्ते आत्मकेंद्री नाहीत असं ते म्हणाले.

<><><><><>

वंचित बहुजन आघाडीनं शिरुरमधून मंगलदास बांदल यांना दिलेली उमेदवारी मागे घेतली आहे. बारामती लोकसभा मतदारसंघाविषयी पक्षाच्या विरोधात बांदल यांनी भूमिका घेतल्यानं पक्षानं ही कारवाई केली आहे.

<><><><><>

भाजपा आज स्थापना दिन साजरा करत आहे. भाजप स्थापना दिनानिमित्त आज मुंबई पक्ष कार्यालयात मुंबई शहर अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. यावेळी भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. राज्यात इतरत्रही उत्साहात हा कार्यक्रम झाला.

स्थापना दिनानिमित्त भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि पक्षाध्यक्ष जे पी नड्डा यांनी सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढण्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होत आहेत. भंडारा जिल्ह्यात मोजा उसरागोंदी इथं आज प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी आणि अंगणवाडीतल्या लहान मुलांनी प्रभातफेरी काढून घोषवाक्यांच्या गजरात जनजागृती केली.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण अकोला आणि उद्याच्या भागात हिंगोली लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

धाराशिव जिल्ह्यातल्या सुमारे ३ हजार हेक्टर शासकीय जमिनीची शेतकऱ्यांच्या नावावर खोटी नोंद करत, महा ई सेवा केंद्र चालकांनी शासनाची आणि विमा कंपन्यांची फसवणूक केल्याचं उघड झालं आहे. शासकीय जमिनीचे कोणतेही भाडेकरार किंवा संमतीपत्र नसतांना सुमारे एक हजार एकशे सत्तर शेतकऱ्यांच्या नावावर खोट्या नोंदी दाखवत हा पीक विमा या केंद्र चालकांनी भरला होता, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. धाराशिवच्या कृषी उपसंचालकांनी याप्रकरणी सरकारची ३ कोटी रुपयांची अधिक रकमेची फसवणूक केल्याची तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणी २४ सेवा केंद्र चालकांवर गुन्हा दाखल झाला आहे. यात बीड जिल्ह्यातले १६, छत्रपती संभाजीनगर आणि परभणी जिल्ह्यातले प्रत्येकी दोन, नांदेड, सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातल्या प्रत्येकी एका सेवा केंद्राचा समावेश आहे.

**<><><><><>**

रत्नागिरी जिल्ह्याच्या खेड तालुक्यातल्या बोरज - शिव फाटा इथं अमली पदार्थांचा साठा जप्त करुन तिघा तरुणांना रत्नागिरी पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणातले तिघेजण २० ते २३ वर्षांचे आहेत. त्यांच्याकडून तीन किलो ९५४ ग्रॅम गांजासह एक वाहन, तीन मोबाइल फोन्स आणि इतर साहित्य असा एक लाख ४८ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरता २६ फेब्रुवारी पासून आरक्षण अधिनियम,२०२४, अंमलात आल्यानं या अधिनियमातल्या तरतुदी विचारात घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने काही परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ तसंच १९ मे

रोजी होणाऱ्या समाज कल्याण अधिकारी, गट-ब आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. परिक्षांच्या सुधारित तारखा लवकरच जाहीर केल्या जातील, असं आयोगानं कळवलं आहे.

**<><><><><>**

चैत्र शुद्ध एकादशीला श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक पंढरपुरात येतात. चैत्री यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना उष्णतेचा त्रास होऊ नये यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी चैत्र यात्रा नियोजन बैठकीत दिल्या. प्रांत कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

'विठ्ठल मंदिराच्या गाभाऱ्यात संवर्धनाचं काम सुरू असल्यानं पदस्पर्श दर्शन बंद आहे. चैत्र यात्रेला होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन १५ ते २१ एप्रिल या कालावधीत पहाटे पाच ते रात्री १२ पर्यंत फक्त मुखदर्शन उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचं बैठकीत सांगण्यात आलं.

**<><><><><>**

केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयानं पुण्यातल्या सावित्रीबाई फुले विद्यापीठातल्या आरोग्यशास्त्र विभागाला 'आयुष सेंटर ऑफ एक्सलन्स' या प्रकल्पाकरता अर्थसहाय्य मंजूर केलं आहे. या प्रकल्पात आरोग्यशास्त्र विभागाबरोबरच जैव माहितीशास्त्र, प्राणिशास्त्र आणि सूक्ष्मजीवशास्त्र हे विभागही सहभागी असून या अंतर्गत आधुनिक साधनांच्या सहाय्यानं आयुर्वेदाच्या संकल्पना आणि औषधांचा अभ्यास केला जाईल. त्याचप्रमाणे आयुर्वेदिक औषधांचा सांध्यांच्या विकारामध्ये

होणारा उपयोग तसंच आयुर्वेद चिकित्सेनं मानवी शरीरातील जीवाणुंवर होणारा परिणाम देखील अभ्यासला जाणार आहे.

<><><><><>

उन्हाळी सुट्ट्यांमध्ये होणारी प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेनं अतिरिक्त उन्हाळी विशेष रेल्वे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. १० आणि १२ एप्रिलला छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते महू दरम्यान तर १ आणि ५ मे रोजी महू ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस अशा ४ फेऱ्या होतील. दर गुरुवारी लोकमान्य टिळक टर्मिनस ते कोच्चुवेली दरम्यान आणि दर शनिवारी कोच्चुवेली ते लोकमान्य टिळक टर्मिनस अशा रेल्वेच्या एकूण २४ फेऱ्या होतील.

<><><><><>

पालघर जिल्ह्यातल्या ऐतिहासिक वसई किल्ल्याभोवती संरक्षक जाळ्याचं कुंपण बसवण्यात येत आहे. किल्ल्यावर संध्याकाळी सात नंतर प्रवेशासाठी बंदी घातली आहे. मोठ्या प्रमाणावर इथं पर्यटक भेट देतात त्यामुळं किल्ल्याचं नुकसान होऊ नये यासाठी पुरातत्व विभागानं हा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

रेल्वे मार्गांवर होणाऱ्या अपघातांचं प्रमाण शून्यावर आणण्यासाठी मध्य रेल्वेनं एक जनजागृतीपर सुरक्षा मोहीम सुरु केली आहे. त्यानिमित्त आज मुंबई उपनगरात चुनाभट्टी स्थानक, कुर्ला स्थानकावरील लेव्हल क्रॉसिंग आणि मानखुर्द-गोवंडी, शहाड, आंबिवली आणि बदलापूर इथं विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. रेल्वे मार्ग न ओलांडता पादचारी पूल, उड्डाणपुल, सरकते जिने आणि लिफ्ट्स यांसारखे सुरक्षित पर्याय वापरणं याविषयी प्रवाशांना समजावून

सांगण्यासाठी फलकाद्वारे समुपदेशन, माहिती पत्रिकांचं वितरण, पथनाट्य इत्यादी कार्यक्रम करण्यात आले.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज राजस्थान रॉयल्सचा सामना रॉयल चॅलेंजर बंगळुरूशी होणार आहे. जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल. या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला.

**<><><><><>**

राज्यात येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे. या काळात कोकणात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. दरम्यान गेल्या २४ तासांत राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान सोलापूर इथं ४३ पूर्णांक एक अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

दरम्यान, उन्हाच्या कडाक्यामुळे नांदेडच्या हिमायत नगर इथं एका युवकाचा काल उष्माघातानं मृत्यू झाला.

**//<><><><><>//**